PNA/HSG/467/68

# श्रीराम ज्योती सहकारी गृहरचना संस्था. मर्यादित.

२०/४८, गुळवणी महाराज रस्ता, एरंडवणे, पुणे - ४११००४

दिनांक: ०१.०८.२०२५

## विशेष सर्व साधारण सभा नोटीस

श्रीरामज्योती सहकारी गृहरचना संस्था मर्यादित एरंडवणे, पुणे येथील इमारतींच्या पुनर्विकास योजनेसाठी विशेष सर्वसाधारण सभा ही राधिका बंगला, पहिला मजला, पटवर्धन बाग, पुणे या ठिकाणी रविवार दि. १७.०८.२०२५ रोजी सकाळी ठीक १०:३० वाजता आयोजित केली आहे. संस्थेच्या व्यवस्थापन समितीने प्राप्त निविदांची छाननी करून प्राप्त निविदाधारकांची गुणवत्ता, प्रतिष्ठा, अनुभव आणि स्पर्धात्मक दर इत्यादी बाबी तपासून तसेच विकसकांचे प्राथमिक सादरीकरण करून सभासदांच्या समोर ठेवले आहेत. त्यांच्या आलेल्या निविदा संस्थेच्या व्यवस्थापन समितीने सभासदांनी अभ्यासण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात ठेवले आहेतच व संस्थेच्या सभासदांकरिता विकसकांचे सादरीकरण दि. १२.०७.२०२५ रोजी च्या सभेमध्ये झाले आहेत. तरी आता **०१) मे. रुई यूनिवर्सल रिअल्टीज एलएलपी** (M/s. Rui Universal Realties LLP), **०२) मे. एस. के. फॉर्च्यून** (M/s. S. K. Fortune), **०३) मे. गंगोत्री होम्स** (M/s. Gangotree Homes) सदर निवडक विकासकांपैकी एकाची निवड संस्थेच्या पुनर्विकास कामी करण्यासाठी सदर विशेष सर्वसाधारण सभा आयोजित केली आहे. सदर विशेष सर्वसाधारण सभा ही मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (१), पुणे यांचे प्राधिकृत अधिकारी यांच्या उपस्थिती मध्ये होणार आहे. सदर विशेष सर्वसाधारण सभेपुढे खालील विषय मांडण्यात येणार आहेत.

**विषय क्र. ०१:** संस्थेच्या पुनर्वाकासासंदर्भात प्राप्त झालेल्या निविदांची छाननी करून प्राप्त निविदाधारकांची गुणवत्ता, प्रतिष्ठा, अनुभव आणि स्पर्धात्मक दर इत्यादी बाबी तपासून ०३ निविदा धारकांचे सभासदांसमोर दि. १२.०७.२०२५ रोजी च्या सभेमध्ये सादरीकरण झाले असून, सदर ०३ निविदाधारकांपैकी एकाची संस्थेच्या इमारतीचे पुनर्विकसन करणे कामी विकसक म्हणून निवड करणे, त्याकरिता सभासदांचे मतदान घेणे.

**विषय क्र. ०२:** विषय क्र. ०१ नुसार निवड करण्यात येणाऱ्या विकसकास इरादापत्र (Letter of Intent) देण्याकरिता इरादापत्रावर सह्या करण्याचे अधिकार संस्थेचे मा. अध्यक्ष व मा. सेक्रेटरी यांना देणे.

आपले कृपाभिलाषी,

शशांक गाजरे
अध्यक्ष

गोपाळ कुलकर्णी
सचिव